नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट क मधील लिपिक टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना गट क मधील शिधावाटप निरीक्षक, संवर्गात पदोन्नती देणेकरीता मा. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३० मे, २०२३ रोजी दुपारी १२:३० वाजता आयोजीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

---

मा. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत विभागीय पदोन्नती समितीचे बैठकीस खालीलप्रमाणे पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.<br>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई | अध्यक्ष |
| २) | श्री. प्रशांत सुधाकरराव काळे<br>उपनियंत्रक शिधावाटप (आस्थापना), मुंबई (अति. कार्यभार) | सदस्य सचिव |
| ३) | श्री. गणेश प्रभाकर बेल्लाळे<br>उपनियंत्रक शिधावाटप ड परिमंडळ, सांताक्रुझ | सदस्य |
| ४) | श्री. रामकृष्ण नेमाजी कांबळे<br>सहायक नियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ वडाळा. | मागासवर्गीय सदस्य |

सदर बैठक सन २०२२-२३ ( दि. १/९/२०२२ ते दि.३१/८/२०२३) या निवडसूची वर्षातील लिपिक टंकलेखक (वेतनश्रेणी एस-६, १९९००- ६३२००) गट - क या संवर्गातून शिधावाटप निरीक्षक, गट - क , (वेतनश्रेणी एस-८, २५५००-८११००) या संवर्गात नियमित पदोन्नती देण्यासाठी सदर विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजीत करण्यात आली आहे.

२. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दिनांक १८/०४/२०२२ रोजीचे शासन निर्णयान्वये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाकरीता सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. सदर सुधारीत आकृतीबंधात या यंत्रणेस **शिधावाटप निरीक्षक, गट - क संवर्गात ४४८ पदे मंजूर केलेली आहेत.** दिनांक ३०/५/२०२३ रोजीचे स्थितीस शिधावाटप निरीक्षक, गट - क संवर्गातील पदांची स्थिती खालीलप्रमाणे

| पदनाम | मंजूर | कार्यरत | रिक्त |
|---|---|---|---|
| शिधावाटप अधिकारी | ४४८ | ४१२ | ३६ |

३. दिनांक १/५/२०२३ ते दि. ३१/०८/२०२३ या कालावधीत शिधावाटप निरीक्षक संवर्गातील खालील कर्मचारी त्यांच्या नावासमोर नमूद दिनांकास शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम व कार्यालय | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. भालचंद्र मारूती भोसले | शिधावाटप निरीक्षक (प्र)<br>शि.का.क्र. १९ अ दादर | दि. ३०.०६.२०२३ |

४. सन २०२२-२३ या निवडसुचीवर्षात शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे पदे उपलब्ध होत आहेत.

| | |
|---|---|
| दि. ३०.५.२०२३ रोजीची रिक्त पदे | ३६ |
| दि. ३१.०८.२०२३ पर्यंत रिक्त होणारी संभाव्य पदे | १ |
| पदोन्नतीकरीता उपलब्ध होणारी एकूण रिक्त पदे | ३७ |

५. शासनाचे पत्र क्र.आस्थाप्र-१८२२/प्र.क्र.७२/ना.पु.१२, दिनांक ०५.१.२०२३ अन्वये संचालक पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई व नागरी पुरवठा (गो/वा) संचालनालय, मुंबई या दोन कार्यालयातील कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे पुरवठा यंत्रणेतील कार्यालयामध्ये समायोजन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयात शिधावाटप निरीक्षक संवर्गात पुढीलप्रमाणे पदे समायोजीत करणेबाबत प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनस्तर | संख्या |
|---|---|---|---|
| १ | शिधावाटप निरीक्षक | S- ८, २५५००-८११०० | ३ |

६. तथापि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र. क्र.आस्थाप्र-१८२२/प्र.क्र.७२/ना.पु.१२, दि. २३/५/२०२३ अन्वये पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई व संचालनालय नागरी पुरवठा (गो/वा) मुंबई कार्यालयांतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे समायोजन करण्यात आले आहे. तथापि सदर समायोजनामध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयात समायोजनाकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या शिधावाटप निरीक्षक संवर्गातील ३ पदांवर एकही कर्मचाऱ्याचे समायोजन करण्यात आलेले नाही. यासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील संबंधित कक्ष ना.पु. १२ मधील संबंधित अधिकाऱ्यांकडे संपर्क करून विचारणा केली असता पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई व संचालनालय नागरी पुरवठा (गो/वा) मुंबई कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयातील शिधावाटप निरीक्षक पदावर समायोजनाकरीता इच्छुकता न दर्शविल्याने त्यांचे सदर कार्यालयात समायोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे समायोजनाकरीता राखीव ठेवलेल्या ३ पदांवर पदोन्नती देण्यासंदर्भातील कार्यवाही नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयास करता येईल असे सांगितले.

७. उपरोक्त वस्तुस्थितीवर बैठकीत झालेल्या चर्चेअंती विभागीय पदोन्नती समितीने सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात पदोन्नतीकरीता उपलब्ध होणाऱ्या ३७ रिक्त पदांवर पदोन्नती देण्याबाबत निर्णय घेतला.

८. विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

१. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत.

२. जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी दिनांक २५ मे २००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत असे अधिकारी/कर्मचारी -

(अ) दि. २५/०५/२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि. २५/०५/२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व ;

(ब) दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या

मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

३. उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील. अशी कार्यवाही करतांना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये.

९. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या.१२, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ अन्वये विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही सुरू असलेल्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देताना अवलंबवयाची कार्यपध्दती मधील मुद्दा १४ (अ) मध्ये " **शिस्तंभंगविषयक कार्यवाहीमध्ये ठपका ठेवण्याची शिक्षा झाल्यास, मोहोरबंद पाकीट उघडून ते पदोन्नतीसाठी पात्र असल्यास त्यांना वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यात यावी. त्यांचा नियमित पदोन्नतीकरीता ज्या निवडसूचीत विचार केला होता, त्या निवडसूचीत संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याचे स्थान निवडसूचीतील लगतच्या ५ अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या खाली आणणे किंवा निवडसूचीत शेवटचे स्थानदर्शविणे यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी."** असे नमूद केले आहे.

सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता तयार करण्यात आलेल्या निवडसूचीमध्ये नाव समाविष्ट असलेल्या खालील कर्मचाऱ्याविरूध्द कोरोना प्रादुर्भावाच्या काळात विनापरवानगी मुख्यालय सोडून कार्यालयात अनुपस्थित राहील्याने विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली होती. सदर विभागीय चौकशीची कार्यवाही पुर्ण होऊन खालील कर्मचाऱ्यांना **"ठपका ठेवणे"** ही शिक्षा बजावण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५/१२/२०१७ च्या शासन निर्णयातील उपरोक्त तरतूदीस अनुसरून सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याकरीता तयार करण्यात आलेल्या निवडसूचीमध्ये खालील कर्मचाऱ्यांचे स्थान निवडसूचीतील त्यांच्या लगतच्या ५ कर्मचाऱ्याच्या खाली आणण्यात आले आहे.

| अ.क्र. | ज्येष्ठता क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| १ | १४ | श्री. विनोद रामदास रसे |
| २ | २६ | श्री. दत्तात्रय जयसिंग शेळके |
| ३ | २९ | श्री.कांतीलाल रंगनाथ गिते |
| ४ | ३१ | श्री. विवेक बाळकृष्ण महाजन |
| ५ | ३२ | श्री. सचिन रामचंद्र मतकर |
| ६ | ३४ | श्री. रमेश रतनसिंग चव्हाण |
| ७ | ३५ | श्री. सुधीर लहू रासम |
| ८ | ३६ | श्री. गणेश गोपालराव रोकडे |
| ९ | ४४ | श्री. अमित चंद्रकांत भंडगर |
| १० | ५३ | श्री. सुनिल बाबाजी ठाकरे |
| ११ | ५५ | श्री. महेश दिनाजी होळकर |

१०. सामान्य प्रशासन विभाग, **शासन निर्णय क्र.दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ५ जुलै, २०२१** अन्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "अ" व गट "ब" मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयात " दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट अ व गट ब मधील नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified

Posts) पदोन्नतीमध्ये ४% आरक्षण देण्यासाठी खालील अ ते इ मधील दिव्यांग प्रकारांचा विचार करावा. खाली नमूद "अ" "ब" आणि "क" या दिव्यांग प्रकारांसाठी प्रत्येकी १% आरक्षण तसेच "ड" व "इ" या प्रकारांसाठी १% याप्रमाणे एकूण ४% आरक्षण देण्यात यावे. पदोन्नतीमध्ये विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदाच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत." असे नमूद करण्यात आले आहे.

(आ)अंध/ अल्पदृष्टी

(ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता

(क) अस्थीव्यंगता/मेंदुचा पक्षाघात/कृष्ठरोग मुक्त/शारीरिक वाढ खुंटणे/आम्ल हल्लाग्रस्त/स्नायु विकृती

(ड) स्वमग्नता

(इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदांवर

११. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण विभाग शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०२१/१२८/प्र.क्र.२०/ना.पु.१२, दिनांक २४ मे, २०२१ शासन निर्णयान्वये शिधावाटप निरीक्षक संवर्गात दिव्यांग प्रवर्गाकरीता पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत.

| पदनाम | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|
| शिधावाटप निरीक्षक (प्रशासन/तपासणी) | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC,Dw, AAV<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |

१२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता उपलब्ध होणाऱ्या **३७ पदांच्या ४ टक्केप्रमाणे १ पद दिव्यांग आरक्षणांतर्गत पदोन्नतीकरीता आरक्षित होते.**

१३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दिनांक २० एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयातील अ.क्र. ५ मधील ५.२ मध्ये **"एखादा दिव्यांग अधिकारी/कर्मचारी सेवाज्येष्ठतेनुसार (By Seniority) पदोन्नत होत असल्यास व निवडसूचीमध्ये दिव्यांगासाठीचे पद रिक्त असल्यास असे पद दिव्यांग आरक्षणाने भरले असे समजण्यात यावे"** असे नमूद आहे.

श्री. अमोल बबन खंकाळ हे दिव्यांग कर्मचारी असून त्यांच्या दिव्यांगत्वाचा प्रकार अस्थिव्यंग हा आहे. सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता तयार करण्यात आलेल्या निवडसूचीत श्री. अमोल खंकाळ यांचा सेवाज्येष्ठतेने समावेश होत आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २०/४/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील उपरोक्त तरतुदीनुसार श्री. अमोल बबन खंकाळ यांना दिव्यांग आरक्षणांतर्गत शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता पात्र ठरविण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीने निर्णय घेतला.

१४. सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात शिधावाटप निरीक्षक, या पदावर पदोन्नती देण्याकरीता तयार करण्यात आलेल्या निवडसुचीत नमूद कर्मचारी यांची संगणक अर्हता नोंद, मराठी/हिंदी उच्चस्तर/निम्नस्तर परिक्षा उत्तीर्ण/सूट, मत्ता व दायित्व विवरणपत्र, गोपनीय शेरे, विभागीय चौकशी, गोपनीय अहवाल इ. बाबींची माहिती विभागीय समितीसमोर ठेवण्यात आली. सदर माहिती विभागीय पदोन्नती समितीच्या सदस्यांनी पडताळली.

१५. निवडसुचीतील अ.क्र. १ वरील श्री. जगजीत वसंत पाटील, यांना दिनांक ०२/५/२०१३ च्या आदेशान्वये लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरूपी पदावनत ही शिक्षा देण्यात आलेली असल्याने त्यांना शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता अपात्र ठरविण्याचा विभागीय पदोन्नती समितीने निर्णय घेतला.

१६. खालील कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परिक्षा अनुत्तीर्ण असल्याने तसेच दिर्घकालावधीपासून कार्यालयात अनुपस्थित असल्याने विभागीय पदोन्नती समितीने त्यांना पदोन्नतीकरीता अपात्र ठरविण्याचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | ज्येष्ठता क्रमांक | मुळ प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रतिश अशोक देऊळकर | २ | खुला | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परिक्षा अनुत्तीर्ण |
| २ | श्री. दिगंबर मधूकर पाटील | ३ | भ.ज.क. | अपात्र<br>सेवाप्रवशोत्तर परिक्षा अनुत्तीर्ण |
| ३ | श्री. सुदिप सुधाकराव बहीरव | ४ | खुला | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |
| ४ | श्री. राजकुमार हरीबंस गुप्ता | ५ | खुला | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परिक्षा अनुत्तीर्ण |
| ५ | श्री. राजेशकुमार काशीनाथ शर्मा | ६ | खुला | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |
| ६ | श्री. विजयनारायण रामसमूज पाल | ७ | खुला | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |
| ७ | श्री. प्रकाश रामचंद्र तळपाडे | ९ | अ.ज. | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |
| ८ | श्री. स्वानंद सुहास पेंडलवार | १० | खुला | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |
| ९ | श्रीम. योगिता नवनाथ पाटील | १२ | इ.मा.व. | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |
| १० | श्रीम. प्रिती रुस्तूमराव सवडकर | १३ | खुला | अपात्र<br>दिर्घकालावधीपासून कार्यालयात विनापरवानगी अनुपस्थित असल्याने |
| ११ | कु. सोनल प्रल्हाद भड | १५ | इ.मा.व. | अपात्र<br>दिर्घकालावधीपासून कार्यालयात विनापरवानगी अनुपस्थित असल्याने |
| १२ | श्री. अमर गुलाब काकडे | १७ | अ.जा. | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | श्रीम. लिखिता अनुप उंबरकर | १८ | अ.ज. | अपात्र<br>दिर्घकालावधीपासून कार्यालयात विनापरवानगी अनुपस्थित असल्याने |
| १४ | श्रीम. योगिता प्रविण सहारे | १९ | अ.ज. | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |
| १५ | श्री. तुषार रमेश पगारे | २० | अ.जा. | अपात्र<br>सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनुत्तीर्ण |
| १६ | श्री. मुकेश दिनकर कांबळे | २१ | अ.जा. | अपात्र<br>दिर्घकालावधीपासून कार्यालयात विनापरवानगी अनुपस्थित असल्याने |

१७. निवडसुचीतील अ.क्र. ३९ वरील श्री. गणेश गोपाळ रोकडे, लि/टं ( ज्येष्ठता क्र.३६) हे शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता आवश्यक बाबींची पुर्तता करीत आहे. तथापि त्यांनी दिनांक १५.०५.२०२३ रोजीच्या कार्यालयास सादर केलेल्या विनंती अर्जान्वये शिधावाटप निरीक्षक पदावर मिळणारी पदोन्नती नाकारत असल्याचे कळविले आहे. सबब, विभागीय समितीने श्री. गणेश रोकडे, लि/टं यांचे पदोन्नतीमधीलं नाव वगळून सेवाज्येष्ठतेनुसार पुढील कर्मचाऱ्यास पदोन्नती देणेबाबत निर्णय घेण्यात आला.

१८. सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात शिधावाटप निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्याकरीता तयार करण्यात आलेल्या निवडसूचीतील सेवाज्येष्ठतेनुसार तसेच पदोन्नतीसाठीचे आवश्यक निकष पुर्ण करणाऱ्या खालील ३५ कर्मचाऱ्यांना विभागीय पदोन्नती समितीने शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता पात्र ठरविले.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | ज्येष्ठता क्रमांक | मुळ प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. कल्पना अमृत लिंगम | ८ | खुला | पात्र |
| २ | श्रीम. मानसी मिलींद मोहिते | ११ | खुला | पात्र |
| ३ | श्री. विनोद रामदास रसे | १४ | इ.मा.व. | पात्र |
| ४ | श्री. अमोल बबन खंकाळ (दिव्यांग) | २२ | अ.जा. | पात्र |
| ५ | श्री. मनिष शरद शास्त्री | २३ | खुला | पात्र |
| ६ | श्री. जितेंद्र अरूण घोलप | २४ | खुला | पात्र |
| ७ | श्री. विश्वास शरद तळेकर | २५ | खुला | पात्र |
| ८ | श्री. प्रमोद शिवाजी घोडके | २७ | खुला | पात्र |
| ९ | श्री. राहूल बापुराव बोबडे | २८ | अ.जा. | पात्र |
| १० | श्री. अमोल रामदास उकर्डे | ३० | वि.मा.प्र. | पात्र |
| ११ | श्री. दत्तात्रय जयसिंग शेळके | २६ | भ.ज.क. | पात्र |
| १२ | श्री. सुहास शरद गायकवाड | ३३ | खुला | पात्र |
| १३ | श्री. कांतीलाल रंगनाथ गिते | २९ | भ.ज.ड | पात्र |
| १४ | श्री. विवेक बाळकृष्ण महाजन | ३१ | वि.जा.अ. | पात्र |
| १५ | श्री. सचिन रामचंद्र मतकर | ३२ | भ.ज.क. | पात्र |
| १६ | श्री. भगवान रामकिसन कुबेर | ३७ | खुला | पात्र |
| १७ | श्री. रमेश रतनसिंग चव्हाण | ३४ | वि.जा.अ. | पात्र |
| १८ | श्री. योगेश उमाजी मोरे | ३८ | खुला | पात्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | श्री. सुधीर लहू रासम | ३५ | खुला | पात्र |
| २० | श्री. सुनिल सुखदेव साळूंखे | ४० | खुला | पात्र |
| २१ | श्री. प्रशांत सदाशिव मोहिते | ४१ | खुला | पात्र |
| २२ | श्री. कपिल हिरामण कानिंदे | ४२ | अ.जा. | पात्र |
| २३ | श्री. साईनाथ विठ्ठलराव पाटील | ४३ | खुला | पात्र |
| २४ | श्री. सुनिल जगन्नाथ तुपे | ४५ | खुला | पात्र |
| २५ | श्री. गणेश रामदास मगर | ४६ | खुला | पात्र |
| २६ | श्री. व्यंकटरमण हणमंतराव पाटील | ४७ | इ.मा.व. | पात्र |
| २७ | श्री. कर्तव्य सुर्यप्रकाश तोरसे | ४८ | खुला | पात्र |
| २८ | श्री. शिवाजी बापुराव जाधव | ४९ | खुला | पात्र |
| २९ | श्री. अमित चंद्रकांत भंडगर | ४४ | भ.ज.क. | पात्र |
| ३० | श्री. प्रदिप शांताराम पाटील | ५० | खुला | पात्र |
| ३१ | श्री. सुरेश युवराज पाटील | ५१ | खुला | पात्र |
| ३२ | श्री. नामदेव राजेंद्र पडुळकर | ५२ | खुला | पात्र |
| ३३ | श्री. अविनाश बाबुराव चावरे | ५४ | खुला | पात्र |
| ३४ | श्री. प्रशांत मधुकर मेरत | ५६ | इ.मा.व. | पात्र |
| ३५ | श्री. अंकुश भगवान मैनकर | ५७ | खुला | पात्र |

१९. खालील कर्मचाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे प्रकरण सुरू असल्याने विभागीय पदोन्नती समितीने सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांचा **"सोबतच्या मोहोरबंद पाकीटात"** ठेवणेबाबत निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | निवडसुचीतील अ.क्र. | मुळ ज्येष्ठता क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. ज्ञानेश प्रकाश पवार | १५ | १६ | बंद लिफाफा |
| २ | श्री. प्रतापसिंग उत्तमसिंग ब्रम्हणात | ३८ | ३९ | बंद लिफाफा |

२०. शिधावाटप निरीक्षक पदावर पदोन्नतीकरीता पात्र ठरविण्यात आलेल्या ३५ कर्मचाऱ्यांपैकी सेवज्येष्ठतेनुसार सुरवातीच्या ३४ कर्मचाऱ्यांचे पदोन्नती आदेश त्वरीत निर्गमित करण्याबाबत व उर्वरीत १ कर्मचाऱ्याचा पदोन्नती आदेश श्री. भालचंद्र मारुती भोसले, शिधावाटप निरीक्षक (प्र), शि.का.क्र. १९ अ हे नियत वयोमानानुसार दि. ३०/६/२०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर निर्गमित करण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीने निर्णय घेतला.

वरीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीचे कामकाज पुर्ण करण्यात आले. शेवटी अध्यक्ष महोदय यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा समाप्त झाल्याचे घोषित केले.

( रामकृष्ण कांबळे )
सहायक नियंत्रक शिधावाटप,
ई परिमंडळ, वडाळा, सदस्य
तथा मागासवर्गीय सदस्य

( गणेश बेल्लाळे )
उपनियंत्रक शिधावाटप,
ड परिमंडळ, सांताक्रुझ,
सदस्य

( प्रशांत काळे )
उपनियंत्रक शिधावाटप
(आस्थापना), प्रधान कार्यालय
(अति.कार्यभार),
सदस्य सचिव

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई, अध्यक्ष